स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावकक्र. : व.वि.श.म./**
**दिनांक :** ०६/०८/२०२५

वसई-विरार शहर महानगरपालिका
प्रेसनोट

वसई तालुक्यातील प्रलंबित वनदावे, अमृत आहार २.० योजनेचा आढावा, बांबू लागवड आढावा, आदिवासी व महिलांच्या विकासाबाबत महानगरपालिकेने केलेल्या कामाचा आढावा घेण्यासाठी आज दि.०६ ऑगस्ट २०२५ रोजी वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालयातील सभागृहात राज्य स्तरीय आदिवासी विकास आढावा समिती अध्यक्ष मा.श्री.विवेक पंडित (मंत्री दर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न झाली. या आढावा बैठकीस महानगरपालिका आयुक्त मा.श्री.मनोजकुमार सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, अतिरिक्त आयुक्त श्री.दिपक सावंत, उप-विभागीय अधिकारी श्री.शेखर घाडगे, उप-जिल्हाधिकारी(रोहयो) श्रीम.विजया जाधव, महानगरपालिकेचे उप-आयुक्त श्री.दिपक झिंजाड, उप-आयुक्त श्री.अजित मुठे, उप-आयुक्त श्रीम.स्वाती देशपांडे, उप-आयुक्त श्री.प्रशांत जाधव, तहसीलदार वसई श्री.अविनाश कोष्टी, आदिवासी बांधव, महानगरपालिका व इतर शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.
सदर बैठकीत प्रलंबित वनहक्क दावे जलदगतीने निकाली काढण्याची सूचना मा.अध्यक्षांनी संबंधित अधिकारी वर्गाला दिली. बांबू लागवड करणे हे पर्यावरणाच्या दृष्टीने फायद्याचे असून त्याचबरोबर येथील नागरिकांना उत्पन्नाचे साधन निर्माण करणेच्या दृष्टीनेही महत्वाचे असल्यामुळे बांबू लागवडीच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना तात्काळ करून बांबू लागवड वाढविणे संदर्भातील सूचना यावेळी संबंधितांना देण्यात आल्या. यावेळी आदिवासी व महिलांच्या विकासाबाबत महानगरपालिकेने केलेल्या कामांबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी उपस्थितांमार्फत महानगरपालिका क्षेत्रातील विशेषतः आदिवासी पाड्यांतील पाणीपुरवठा, विद्युत व्यवस्था, रस्तेसंबधी इ.विविध समस्या मांडण्यात आल्या. या समस्या जलदगतीने उपाययोजना करून सोडविण्याच्या सूचना मा.आयुक्त महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांना बैठकीत दिल्या.